CMYK


सिद्धार्थ खरात यांच्यावतीने दिंड्यांना विना वाटप >> पान 2

पीएम विश्वकर्मा योजनेतून पारंपरिकता आणि कौशल्याला नवीन ऊर्जा - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी >> पान 3

घरकुले बांधकामास सरकारी जागांसाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची आमदार रायमुलकर यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी >> पान 4


**सुविचार**

रागाला जिंकण्याचा एकमेव उपाय - मौन !


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 45 ■ शनिवार, दि. 21 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





सुपरस्टार अभिनेता आमिर खान आज अकोल्यात

आतील पान


# आ. रायमुलकर यांच्याबाबत सोशल मीडियावर नाराजीचा सूर





## बुलढाणा मतदार संघाचा विकास होतो तर मेहकर मतदार संघाचा का नाही, चर्चेला उधाण

## आ.संजय गायकवाड यांचे होतेय जिल्ह्यात कौतुक तर आ. संजय रायमूलकरवर नाराजी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/विशेष प्रतिनिधी : बुलढाण्याचा शहरासह मतदार संघाचा झपाट्याने विकास पाच वर्षात होऊ शकतो, मग आ. संजय रायमुलकर हे तर पंधरा वर्षापासून आमदार असताना मेहकर विधानसभा मतदार संघाचा पाहिजे तसा विकास का झाला नाही.आ. संजय गायकवाड हे विकासाच्या बाबतीत कर्तव्यनिष्ठ आहेत..? तर मेहकरचे आ. संजय रायमुलकर हे आमदार यांची चर्चा सोशल मीडियावर करीत जनता आ. संजय रायमुलकर यांच्या कार्यावर प्रश्न निर्माण करीत आहेत.**

बुलढाणा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासह २६ स्मारकांच्या करोडो रुपयांच्या विकास कामाचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते दि.१९ सप्टेंबर रोजी संपन्न.यावरून आमदार संजय गायकवाड यांना विकास कामासाठी निधी खेचून आणण्यात मोठे यश मिळाले असल्याचे दिसून येत आहे. तर मेहकर विधानसभेतील महत्त्वाचे दोन तालुके विकासापासून अद्यापही वंचित आहेत.



देविदास खनपटे

मुख्य संपादक

गेल्या पंधरा वर्षापासून डॉ.संजय रायमुलकर आमदार हे या मतदारसंघाचे आमदार म्हणून प्रतिनिधीत्व करीत आहेत. मात्र त्यांना विकास कामे खेचून आणता आले नसल्याची चर्चा सोशल मीडियावर होत असून मतदारांमध्ये प्रचंड नाराजीचा सूर उमटला जात आहे. बुलढाण्याचे आ. संजय गायकवाड यांनी अवघ्या पाच वर्षात बुलढाण्याचे चित्र बदलले आहे व बुलढाणा विधानसभेमध्ये करोडो रुपयांचे कामे अवघ्या पाच वर्षात खेचून आणले आहेत. त्याच पार्श्र्वभूमीवर डॉ. संजय रामुलकर १५ वर्षात कामे आणण्यास अथवा करण्यास अत्यंत निष्क्रिय ठरले असल्याची चर्चा आता मेहकर विधानसभेमध्ये चांगलीच रंगत आहे. तर शिवसैनिक स्थानिक आमदारावर नाराज असल्याचा सूर सोशल मीडियावर सुरू असलेल्या चर्चेतून दिसून येत आहे. त्यामुळे येणाऱ्या विधानसभेमध्ये मेहकर मतदार संघाचे तीन टर्म राहिलेले आमतदार डॉ. संजय रायमुलकर यांना याचा मोठा झटका बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### बुलढाणा प्रमाणे विकास का झाला नाही

बुलढाणा शहर अथवा मतदार संघात झालेल्या विकास कामाप्रमाणेच मेहकर शहर व लोणार शहर अथवा मेहकर विधानसभा मतदार संघात का झाली नाहीत, असा प्रश्र्न सोशल मीडियावर आता शिवसैनिकच करीत असून आ. संजय रायमुलकर यांच्यासोबत राहणार आहे. यात काही शंका नसल्याचे बोलून मेहकर मतदार संघातील मराठा समाज व मतदार संघातील मतदारांकडून आपल्याकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण झाल्या नसल्याची खंत मेहकर मतदार संघाचे आ. डॉ. संजय रायमुलकर यांच्याबाबत व्यक्त केली जात आहे.

### काय आहे मेहकर व लोणार मध्ये ऐतिहासिक

लोणार म्हणजे जगद्विख्यात, जगप्रसिद्ध उल्कापातामुळे निर्मित जगातल्या तीनपैकी दोन नंबरचे आणि बेसॉल्टीक खडकातले जगातले एकमेव सरोवराचे गाव आहे. लोणार सरोवर परिसरात ३२ मंदिरे, १७ स्मारके, १३ कुंड आणि ५ शिलालेख आहेत यांपैकी २७ मंदिरे, तीन स्मारके, सात कुंड आणि तीन शिलालेख सरोवराच्याच परिसरात आहेत आणि इतर वर गावाच्या परिसरात आहेत. इथली मंदिरे आणि कुंड म्हणजे आणखी वेगळा अनुभव.असा लोणार चा ऐतिहासिक इतिहास आहे. हे जगप्रसिद्ध सरोवर व हा इतिहास जाणून घेण्यासाठी देशातीलच नव्हे तर विदेशातील पर्यटक या ठिकाणी हजेरी लावतात त्यावेळेस मात्र विकास हरवल्यासारखे नक्कीच जाणवते हे मात्र तेवढेच खरे..

### का आहे मेहकर तालुक्यात जनतेची नाराजी...

मेहकर तालुक्यांत जवळपास ९८ ग्रामपंचायत असून जवळपास मेहकर तालुक्यामध्ये १६० गावे आहेत. यामधील अनेक गावे विकासापासून कोसो दूर असल्याचे बोलल्या जात आहे तर इतर गावांमध्ये आजही अनेक समस्या ह्या कायम असून स्थानिक लोकप्रतिनिधी पंचायत राज समितीचे अध्यक्ष तथा आमदार यांच्यावर जनतेची नाराजी दिसून येत आहे. सलग पंधरा वर्ष आमदारकी आपल्या हातात असताना व सत्ताही असताना विकास कामासाठी निधी खेचून आणण्यासाठी अपयश आलेत का..? याबद्दल आता तर्क वितर्क लावल्या जात आहेत तर आता मात्र नाराजी सोशल मीडियाच्या माध्यमातून समोर येत असल्याचे आता हळूहळू दिसून येते आहे..

# देशात सनातन धर्म संरक्षण बोर्डाची स्थापना करा

## तिरुपती मंदिरातील लाडूच्या वादानंतर पवण कल्याण यांची मागणी

दिल्ली : तिरुपती बालाजी मंदिरात तयार करण्यात येणाऱ्या लाडवाच्या प्रसादावरुन सध्या आंध्र प्रदेशासह संपूर्ण देशभरात वादंग निर्माण झाल्याचं पाहायला मिळतंय. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी या प्रसादाबाबत गंभीर आरोप केले. आंध्रचे माजी मुख्यमंत्री जगनम ोहन रेड्डी यांच्या कार्यकाळात या प्रसादाच्या लाडूमध्ये प्राण्यांची चरबी वापरली जात होती, असं आरोप करण्यात आलाय. त्यावर आता आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री आणि अभिनेते पवन कल्याण यांचीही प्रतिक्रिया समोर आली आहे.

आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री आणि अभिनेते पवन कल्याण यांनी देशात सनातन धर्म संरक्षण बोर्डाची स्थापना करण्याचीही मागणी केली आहे. त्यामुळे आता आंध्र प्रदेशात या वादाला चांगलच तोंड फुटलं असून याचे खोलवर परिणाम होत असल्याचं चित्र सध्या आहे.

पवन कल्याण यांनी काय म्हटलं?

पवन कल्याण यांनी एक्स पोस्ट करत म्हटलं की, तिरुपती बालाजी प्रसादमध्ये प्राण्यांची चरबी मिसळल्याच्या निष्कर्षांमुळे आपण सर्वजण व्यथित झालो



आहोत. वायसीपी सरकारने स्थापन केलेल्या टीटीडी बोर्डाने अनेक प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. आमचे सरकार कठोर कारवाई करण्यासाठी कटिबद्ध आहे. परंतु, यामुळे मंदिरांची विटंबना, त्यांच्या जमिनीचे प्रश्न आणि इतर धार्मिक प्रथांशी संबंधित अनेक समस्यांवर प्रकाश पडतो.

पुढे त्यांनी म्हटलं की, संपूर्ण भारतातील मंदिरांशी संबंधित सर्व समस्यांवर लक्ष ठेवण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर 'सनातन धर्म संरक्षण मंडळ' स्थापन करण्याची वेळ आली आहे.राष्ट्रीय स्तरावर सर्व धोरणकर्ते, धर्मप्रमुख, न्यायव्यवस्था, नागरिक, प्रसारमाध्यमे आणि इतर सर्वांनी आपापल्या क्षेत्रात चर्चा केली पाहिजे.मला वाटतं की आपण सर्वांनी एकत्र येऊन 'सनातना धर्माचा' कोणत्याही प्रकारे होणारा अपमान थांबवला पाहिजे.

# विधानसभेच्या तोंडावर भाजपला धक्का; बडा नेता सुनेसह करणार काँग्रेसमध्ये प्रवेश

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** माजी खासदार आणि भाजप नेते भास्कर पाटील खतगावकर हे आज त्यांच्या सून मीनल खतगावकर यांच्यासह काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत. आज दुपारी तीन वाजता मुंबईतील काँग्रेस कार्यालयात त्यांचा पक्षप्रवेश होणार आहे. खतगावकर हे भाजपाचे खासदार अशोक चव्हाण यांचे मेव्हणे आहेत.

काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी चेनीथला आणि प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या उपस्थितीमध्ये खतगावकर यांचा आज काँग्रेसमध्ये प्रवेश होणार असल्याची माहिती समोर आली आहे. काही दिवसांपूर्वीच खतगावकर यांनी नांदेडमध्ये काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याची घोषणा केली होती. ते आज आपल्या सुनेसह काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याची शक्यता आहे. भास्कर पाटील खतगावकर यांच्या सून मीनल खतगावकर या नायगाव विधानसभा मतदारसंघासाठी इच्छूक आहेत.

### कोण आहेत भास्कर पाटील खतगावकर?



- जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन म्हणून राजकारणाला सुरुवात
- १९९० साली बिलोली मतदार संघातून विधानसभेत , तीन वेळा आमदार
- १९९८ साली नांदेडचे खासदार
- तिन वेळा खासदार
- २०१४ साली लोकसभेची उमेदवारी न मिळाल्याने नाराज होउन भाजपात प्रवेश
- २०२१ साली पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश
- अशोक चव्हाण भाजपात गेल्याने पुन्हा फेब्रुवारी २०२४ मध्ये भाजपात प्रवेश
- त्यानंतर आता पुन्हा एकदा काँग्रेसमध्ये प्रवेश




# जालना-बीड रोडवर बस-कंटेनरचा भीषण अपघात; ६ जणांचा मृत्यू, एकाची प्रकृती गंभीर

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालना जिल्ह्यातील जालना वडीगोद्री रोडवरील शहागड गावाजवळ बस आणि ट्रकचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातामध्ये ६ जणांचा मृत्यू झाला असून १८ जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी ६ जणांची प्रकृती गंभीर आहे.

दरम्यान अंबाजोगाई महामंडळाची बस जालन्याला जात होती, अंबडपासून १० किमीवर झालेल्या या अपघातामुळे जालना-बीड मार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. अपघातग्रस्त ट्रकमधून मोसंबी वाहतूक केली जात होती.

जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जालना बीड मार्गावरील शहागडजवळ हा अपघात झाला आहे. घटना घडल्यानंतर स्थानिकांनी मदत कार्य सुरू केले. बीड जिल्ह्यातील गेवराई येथून जालन्याकडे जाणाऱ्या बसला जालन्याहून बीड कडे मोसंबी घेऊन जाणाऱ्या आयशर ट्रकची समोरा समोर धडक झाल्याने हा अपघात झाला.

बस मध्ये एकूण २४ प्रवासी होते यातील किरकोळ जखमींना अंबड येथील प्राथमिक आरोग्यकेंद्रात उपचारासाठी हलवण्यात आले आहे.





CMYK

## द किंग ऑफ स्टॅण्ड अप कॉमेडी; राजू श्रीवास्तव

प्रसिद्ध स्टॅण्ड अप कॉमेडियन राजू श्रीवास्तव यांचा आज २१ सप्टेंबर रोजी दुसरा स्मृतिदिन. दोन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी त्यांची प्राणज्योत मालवली होती. त्यांच्या अकाली निधनाने मनोरंजन विश्र्वावर शोककळा पसरली होती. द किंग ऑफ स्टॅण्ड अप कॉमेडी अशी ओळख असलेल्या राजू श्रीवास्तव यांचा २५ डिसेंबर १९५३ रोजी उत्तरप्रदेश मधील कानपुर येथे जन्म झाला. राजू श्रीवास्तव यांचे वडील कवी होते. बलई काका नावाने त्यांच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या होत्या. राजू श्रीवास्तव लहान असताना आपल्या वडिलांच्या कविता म्हणत. शालेय वयातच त्यांना नकला करण्याचा छंद लागला. शाळेतील शिक्षकांच्या व गावातील माणसांच्या ते हुबेहूब नकला करत. पुढे ते अमिताभ बच्चन यांची नक्कल करू लागले. अमिताभ बच्चन यांचा हुबेहूब आवाज काढून त्यांनी केलेली नक्कल लोकांना इतकी आवडली की लोक त्यांना ज्युनिअर अमिताभ म्हणू लागले. अमिताभ बच्चन यांच्याप्रमाणेच त्यांनी चित्रपट सृष्टीतील इतर कलाकारांची देखील नक्कल करण्यास सुरुवात केली. त्यांचा हा नकलाचा कार्यक्रम प्रेक्षकांना आवडू लागला. कानपूरमधील प्रेक्षक त्यांना कॉमेडीसाठी बोलवू लागले. त्यांचे कार्यक्रम लोकप्रिय होऊ लागले तेंव्हा त्यांच्या एका मित्राने त्यांना त्यांच्या कॉमेडीची सीडी बनवून विकण्याचा सल्ला दिला. मित्राने दिलेला हा सल्ला त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. राजू श्रीवास्तव यांनी त्यांच्या कॉमेडीची सीडी मार्केटमध्ये आणल्यानंतर त्यांच्या सिडीला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाला. मुंबईतही त्यांच्या सीडी विकल्या जाऊ लागल्या. मुंबईतही त्यांना खूप प्रसिद्धी मिळाली त्यामुळे ते मुंबईत आले आणि चित्रपटांसाठी ऑडिशन देऊ लागले. तेजाब आणि मैने प्यार किया या चित्रपटात त्यांना छोट्या भूमिका मिळाल्या. त्यांनतर बाजीगर, मिस्टर आझाद या चित्रपटातही त्यांनी भुमीका केल्या मात्र या भूमिकांनी त्यांना समाधान दिले नाही त्यामुळे ते टीव्हीकडे वळले. देख भाई देख या विनोदी मालिकेत त्यांना काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर त्यांनी शक्तिमान या मालिकेत काम केले. चित्रपट आणि टीव्हीवर काम करताना त्यांनी त्यांची स्टॅण्ड अप कॉमेडी काही सोडली नव्हती ते स्टॅण्ड अप कॉमेडी करतच होते. २००५ साली टीव्हीवर द ग्रेट इंडियन लाफटर चॅलेंज नावाचा कॉमेडी शो आला होता. या शो मध्ये त्यांनी भाग घेतला. या शो ने त्यांना स्टार बनवले. या शो मध्ये त्यांनी सादर केलेले गजोधर काका, पिंकी पार्लरवाली ही पात्रे खूप लोकप्रिय झाली. या शो नंतर त्यांचे देशभर नाव झाले. त्यांना अनेक कार्यक्रमांमध्ये बोलावले जायचे. या काळात त्यांची कॉमेडी किंग अशीच इमेज झाली होती. २००९ साली त्यांनी बिग बॉस शो मध्येही भाग घेतला होता. २००५ ते २०१० हा त्यांचा सुवर्णकाळ होता. या काळात त्यांची लोकप्रियता गगनाला भिडली होती. त्याचा लाभ घेऊन राजकारणात उतरण्याचा त्यांनी निर्णय घेतला मात्र त्यांना राजकारण मानवले नाही त्यामुळे ते पुन्हा कॉमेडीकडे वळले. त्यांनी आपली स्टॅण्ड अप कॉमेडी पुन्हा सुरू केली. आपल्या स्टॅण्ड अप कॉमेडीने त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. राजू श्रीवास्तव यांच्याप्रमाणे अनेकांनी स्टॅण्ड अप कॉमेडी करण्याचा प्रयत्न केला पण राजू श्रीवास्तव यांच्या सारखी नक्कल आणि स्टँड अप कॉमेडी कोणालाही जमू शकली नाही. चित्रपट, टीव्ही आणि स्टेज शो मधून प्रेक्षकांना खळखळून हसवणारे राजू श्रीवास्तव यांचे असे अकाली जाणे प्रेक्षकांना चटका लावून जाणारे ठरले. स्टॅण्ड अप कॉमेडीचे किंग राजू श्रीवास्तव यांना दुसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# सिद्धार्थ खरात यांच्यावतीने दिंड्यांना विना वाटप

## ब्रह्मलीन सखाराम महाराज हिवरेकर पुण्यतिथी निमित्त चिंतन सोहळा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** सुलतानपूर येथील प्रसिद्ध वेदांत आश्रम सिद्धपुर येथे प. पु ब्रह्मलीन सखाराम महाराज हिवरेकर यांच्या २६ व्या पुण्यतिथी निमित्त चिंतन सोहळा २० सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला होता.

या प्रसंगी मेहकर व लोणार तालुक्यातील वेगवेगळ्या गावातून पायदळ वारी दिंड्या आल्या होत्या. यावेळी श्री सिद्धार्थ खरात यांनी या दिंडी सोहळ्यामध्ये सहभागी होऊन आनंद घेतला.या प्रसंगी श्री सिद्धार्थ खरात यांनी आलेल्या सर्व दिंड्याना वीणा वाटप केले. या वेळी श्री सिद्धार्थ खरात यांनी प्रत्येक दिंडीला भेट देत वारकऱ्यांचे कौतुक करून त्यांच्याशी संवाद साधला. सिद्धार्थ खरात यांनी वेदांत आश्रमचे अध्यक्ष जनार्धन आव्हाळे , व कोषाध्यक्ष श्रीकांत भानापुरे यांचा याप्रसंगी सत्कार केला. याप्रसंगी बंडूभाऊ जोगदंड, लालू भाई, सुरेशभाऊ सुरूशे, साहेबराव पाटील हिवाळे, प्रदीप बिल्होरे, गंगाधर खरात व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ब्रह्मलीन सखाराम महाराज हिवरेकर यांच्या पुण्यतिथी





निमित्त वेदांत आश्रम येथे विविध धार्मिक कार्यक्रम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच भाविकांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.या ब्रह्मलीन सखाराम महाराज हिवरेकर यांच्या पुण्यतिथी निमित्त चिंतन सोहळ्याला परिसरातील विविध मान्यवरांनी उपस्थिती लावून दर्शन घेतले व महाप्रसादाचाही लाभ घेतला यावेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे सिद्धार्थ खरात यांच्यावतीने आलेल्या दिंड्यांना विना वाटप करण्यात आले.

# मराठा समाजातील विद्यार्थ्यांना ‘सारथी’ची साथ...

मराठा समाजातील विद्यार्थी व युवकांच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक प्रगतीसाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) ची पुण्यात स्थापना करण्यात आली असून या संस्थेचे उपकेंद्र कोल्हापुरात सुरु आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये सारथीच्या माध्यमातून मराठा समाजातील विद्यार्थी उत्तम यश प्राप्त करत असून आयएएस सेवेत तीन वर्षात १२, आयपीएस मध्ये १८ तर आयआरएस सेवेत ८ आणि इतर केंद्रीय सेवांमध्ये १२ अशा सारथीमधील ५१ विद्यार्थ्यांची युपीएससी परीक्षेत निवड झाली आहे. तर भारतीय वन सेवेसाठी सारथी संस्थेतील २ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. तसेच युपीएससी सीएपीएफ सेवेसाठी संस्थेतील ५ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. सारथी संस्थेच्यावतीने देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणामुळेच स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्यात मराठा समाजातील विद्यार्थ्यांचा टक्का वाढण्यात सारथी संस्थेची मोलाची साथ मिळत आहे...

राज्यातील १ लाख ३३ हजार २३६ विद्यार्थ्यांनी या संस्थेच्या विविध योजनांचा लाभ घेतला आहे. पीएच.डी विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती विभागात २ हजार १०९ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला असून स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण विभागात २५ हजार १०७ तर शिक्षण विभागातंर्गतच्या योजनांचा २५ हजार १३७ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे.तर कौशल्य विकास प्रशिक्षण विभागांतर्गत २० हजार ७४३ लाभार्थ्यांना तर सारथीच्या इतर उपक्रमांतर्गत ६० हजार १४० जणांना फायदा झाला आहे. कोल्हापूर उपकेंद्राच्या वतीनेही जिल्ह्यातील विद्यार्थी व युवकांना सारथीच्या योजनांचा लाभ देण्यात येत आहे.

या संस्थेचे मुख्यालय पुणे येथे असून उपकेंद्र कोल्हापूर येथे कार्यरत आहे.

“शाहू - विचारांना देवूया गती साधुया सर्वांगीण प्रगती”

कोल्हापूरबरोबरच सारथीची राज्यात ८ विभागीय कार्यालये कार्यरत आहेत. खारघर, नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, लातूर, अमरावती व नागपूर या ठिकाणी कार्यरत आहेत. संस्थेमार्फत मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या प्रवर्गाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी विविध कल्याणकारी योजनांची कालबध्द त-हेने व प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

महाराणी ताराराणी स्पर्धा परीक्षा विभाग - सारथी संस्थेच्या वतीने राज्यातील मराठा समाजाच्या प्रगतीसाठी विविध उपक्रम, योजना राबवण्यात येत असून विविध स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. सारथीमार्फत युपीएससी, एमपीएससी स्पर्धा परीक्षांच्या पूर्व, मुख्य तसेच मुलाखत या तिन्ही टप्प्यांवर विद्यार्थ्यांना तयारीसाठी प्रशिक्षण सहाय्य करण्यात येते. यासाठी महाराणी ताराराणी स्पर्धा परीक्षा विभाग कार्यरत असून या उपक्रमांतर्गत युपीएससीच्या पूर्व परीक्षेसाठी पाचशे विद्यार्थी दरवर्षी निवडण्यात येतात. नवी दिल्ली येथील प्रशिक्षणासाठी विद्यार्थांना दरमहा १३ हजार व पुणे येथील विद्यार्थ्यांना दरमहा ९ हजार रुपये विद्यावेतन दिले जाते. तसेच प्रशिक्षण संस्थेचे शुल्क सारथीमार्फत भरले जाते. यामुळेच मराठा समाजातील विद्यार्थी व युवकांचे स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होण्याचे प्रमाण वाढत आहे.

मागील तीन वर्षात एक हजार ४७९ विद्यार्थ्यांना पूर्व परीक्षेसाठी २१ कोटींचा लाभ डिबिटीद्वारे देण्यात आला आहे. युपीएससी मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना ५० हजार रुपये एकरकमी दिले जातात. सारथी मुख्यालयातून विद्यार्थ्यांना झूम मिटींगद्वारे मार्गदर्शन व अडचणी, समस्यांचे निराकरणही करण्यात येते. मागील तीन वर्षात ६५० विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेसाठी ३.२५ कोटींचा लाभ डिबीटीद्वारे देण्यात आला आहे. तर मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना २५ हजार रुपये एकरकमी दिले जातात. मागील तीन वर्षात २०६ विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी ५१ लाख रुपयांचा लाभ डिबीटीद्वारे देण्यात आला आहे.

राज्य सेवा प्रशिक्षण मार्गदर्शन - युपीएससी प्रमाणेच राज्य सेवा परीक्षा अर्थात एमपीएससीमध्येही सारथीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, कोचींग सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. एमपीएससीसाठी साडे सातशे विद्यार्थ्यांची निवड दरवर्षी करण्यात येते. यासाठी पुणे येथील विद्यार्थ्यांना दरमहा ८ हजार रुपये विद्यावेतन दिले जाते. तसेच प्रशिक्षण संस्थेचे शुल्क सारथीमार्फत भरण्यात येते.

मागील तीन वर्षात १ हजार १२५ विद्यार्थ्यांना पूर्व परीक्षेसाठी ८.२६ कोटींचा लाभ डिबीटीद्वारे देण्यात आला आहे. मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना १५ हजार एक रकमी दिले जातात. आत्तापर्यंत मागील तीन वर्षात ७ हजार ३६७ विद्यार्थ्यांना मुख्य परिक्षेसाठी ११ कोटी रुपयांचा लाभ डिबीटीद्वारे देण्यात आला आहे. तसेच मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना १० हजार रुपये एकरकमी दिले जातात. त्यासोबतच विद्यार्थ्यांना सारथीच्या मुख्यालयातून झूम मिटींगद्वारे तसेच अभिरुप मुलाखतीद्वारेही मार्गदर्शन व मुलाखतीची सर्व तयारी करुन घेण्यात येते.

मागील तीन वर्षात ५६६ विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी ५६.६० लाखाचा लाभ डिबीटीद्वारे देण्यात आला आहे. सारथीच्या मार्गदर्शनातून सन २०२१-२२,२३ या वर्षात वर्ग एक श्रेणीमध्ये ७४ तर वर्ग दोन श्रेणीत २३० अशा एकूण ३०४ विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. सारथी संस्थेचे उपकेंद्र कोल्हापूर मधील राजाराम महाविद्यालयाच्या परिसरातील पूर्व आयएएस प्रशिक्षण केंद्राच्या मागे सुरु आहे. सारथी संस्थेच्यावतीने मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या प्रवर्गासाठी विविध कल्याणकारी योजना राबविल्या जात असून यामुळे या समाजातील विद्यार्थी व युवकांचे आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या सक्षमीकरण होण्यास मदतच होत आहे...

**- शब्दांकन- वृषाली पाटील**

### मुंबईत जागावाटपाची चर्चा असतानाच

# नाशिकमध्ये महायुतीत मिठाचा खडा

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडीत सामना रंगणार आहे. महायुती आणि महाविकास आघाडीत सध्या जागा वाटपावरून चर्चा सुरु आहे. त्यातच आता नाशिकमध्ये महायुतीत तणाव वाढल्याचे चित्र आहे.



आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय नेत्यांकडून विविध जागांवर दावेदारी सुरु आहे. काही दिवसांपूर्वी शिवसेना शिंदे गटाने नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघावर दावा केला. शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी थेट उमेदवाराचे नाव जाहीर केले. संजय शिरसाट यांच्या नाशिक दौऱ्यानंतर महायुतीतील मिठाचा खडा पडल्याचे बोलले जात आहे.

संजय शिरसाट यांनी शिवसेनेचे उपनेते अजय बोरस्ते यांनी आयोजित केलेल्या ढोलताशा महोत्सवाच्या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. यावेळी माध्यमांशी बोलताना संजय शिरसाट यांनी नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघाच्या उमेदवाराबाबत मोठं वक्तव्य केलं होतं. अजय बोरस्ते आमच्यासोबत विधानसभेत दिसतील, असे त्यांनी म्हटले होते. नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघावर शिवसेनेने दावा ठोकल्यानंतर जिल्ह्यातील सर्वच जागांवर तयारी असल्याचा इशाराच भाजपने शिवसेनेला दिला आहे. वर्षानुवर्ष कार्यकर्ते काम करत आहेत. त्यामुळे आमची सर्वच जागांवर निवडणूक लढण्याची तयारी असल्याचा दावा भाजपचे प्रदेश प्रवक्ते प्रदीप पेशकार यांनी केला आहे.

संजय शिरसाट यांच्या दौऱ्यानंतर शिवसेना उपनेते अजय बोरस्ते यांनी नाशिक जिल्ह्यातील सात जागांवर लढण्याची तयारी असल्याचा दावा करत वादाला आणखी फोडणी दिल्यानं दोन्ही पक्षातील संघर्ष वाढला आहे. मुंबईत जागा वाटपाच्या चर्चा होत असताना नाशिकमध्ये मात्र दोन्ही पक्षाचे नेते एकमेकांना आव्हान-प्रतिआव्हान देत असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघात भाजपच्या देवयानी फरांदे या सलग दोन टर्मपासून आमदार आहेत. मात्र संजय शिरसाट यांनी अजय बोरस्ते यांचे नाव जाहीर केले. याआधी अजय बोरस्ते हे लोकसभा निवडणुकीसाठी इच्छुक होते. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत झालेल्या चर्चेनंतर अजय बोरस्ते यांनी लोकसभा निवडणुकीतून माघार घेतली होती. पक्षाने संधी दिल्यास नाशिक मध्य विधानसभेतून निवडणूक लढवण्यास तयार असल्याचे अजय बोरस्ते यांनी म्हटले होते. आता नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघातून नक्की कोणाला उमेदवारी मिळणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## संवेदनशील भागात पोलिसांचा रूट मार्च, परिस्थिती नियंत्रणात - पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस.



दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार/प्रतिनिधी :** नंदुरबार शहरात काल झालेल्या दंगलीनंतर आज नंदुरबार शहरात शांतता असून सर्व व्यवहार सुरळीत सुरू आहे. नागरिकांनी कोणत्याही प्रकारचा गैरसमज पसरवू नये असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस यांनी केले आहे. नंदुरबार शहरात आता शांतता असून जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस यांच्या उपस्थितीत संवेदनशील भागातून रूट मार्च काढण्यात आला. आता सर्व ठिकाणी परिस्थिती नियंत्रणात असून शांतता आहे. काल झालेल्या दंगलीत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आरोपींवर मारामारी दंगल असे विविध कलमांद्वारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आतापर्यंत ५५ आरोपींना अटक करण्यात आले असून ५४ आरोपींची नावं निष्पन्न झाले आहेत ते फरार झाले असून त्यांच्या तपास करून त्यांना लवकर अटक करण्यात येणार आहे.या व्यतिरिक्त सीसीटीव्ही कॅमेरे, व ईतर व्हिडिओ तपासून दंगलग्रस्त आरोपीचे नाव निष्पन्न करण्यात येईल व त्यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेण्यात येणार आहे. काल झालेल्या दंगलीत २१ पोलीस कर्मचारी तथा होमगार्ड जखमी झाले आहेत. दंगलग्रस्त भागात रात्रीपासूनच मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असून आताही चोख बंदोबस्त संवेदनशील भागात तैनात करण्यात आला आहे. नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या गैरसमज व अफवा पसरवू नये आपल्याकडे आक्षेपार्ह काही व्हिडिओ आल्यास त्वरित पोलिसांची संपर्क करावा असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस यांनी केले आहे.

# प्रतिबंधित गुंगीकारक गोळ्यांची विक्री करणाऱ्या आरोपींना विविध ठिकाणाहून अटक ; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** ६ सप्टेंबरला जालना शहरामध्ये प्रतिबंधीत घटक असलेल्या तसेच अवैधरित्या गर्भपात व कामवासना उत्तेजित करणाऱ्या गोळ्यांचा साठा मिळून आल्याने आरोपी अल्तमश शेख निसार शेख, संतोष बालासाहेब जाधव, राहुल भागाजी गायकवाड, उद्धव शिवाजी पटारे यांच्याकडे विविध कंपन्याच्या एकूण ०८,११,२८८ रुपयाच्या गोळ्या आढळल्याने त्यांचया विरुद्ध सदर बाजार पोलीस ठाणे जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.



०७ सप्टेंबर रोजी सदर गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे देण्यात आला असून अटक आरोपी यांच्याकडे केलेल्या चौकशीमध्ये त्यांनी सदरचा मुद्देमाल अकोला येथील आरोपी सागर गुणवंतराव आठवले याच्या मार्फत मागवला असल्याचे निष्पन्न झाले त्यामुळे नतर पोलीसांनी त्याला देखील ताब्यात घेतले आहे. आरोपी सागर आठवले याच्या चौकशी दरम्यान त्याने वरील मुद्देमाल अमरावती येथील कपिल किसनलाल साहु याच्याकडून घेतला असल्याचे सांगितल्याने आरोपी कपिल साहु याला देखील पोलिसांनी अटक केले, त्याच्याकडून ८७ हजार किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपी कपिल साहु याच्या चौकशीमध्ये त्याने हा मुददेमाल आरोपी कृष्णा युवराज पहाडे जो मध्यप्रदेश येथे राहणार आहे त्याच्याकडुन मागवला असल्याचे सांगितले त्यामुळे पोलिसांनी आरोपी कृष्णा पहाडे याला मध्यप्रदेश मधून १५ सप्टेंबरला अटक केली. या आरोपी कृष्णा पहाडे याच्या चौकशीमध्ये या प्रकरणात इतर राज्यातील काही आरोपी निष्पन्न झाले असून मुख्य पुरवठादारापर्यंत पोहचण्याचे पोलिसांचे प्रयत्न सुरु आहेत. पुढील तपास सुरु असल्याची माहिती जालना पोलीस अधीक्षक अजय बन्सल यांनी दिली आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# पीएम विश्वकर्मा योजनेतून पारंपरिकता आणि कौशल्याला नवीन ऊर्जा - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

■ वर्धा येथे पीएम विश्वकर्मा योजनेचा वर्षपुर्ती सोहळा उत्साहात ■ अमरावती येथील पीएम मित्रा टेक्सटाईल पार्कचे भूमिपूजन ■ राज्यातील १ हजार आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे उद्‌घाटन ■ पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजनेचा शुभारंभ ■ ग्रामीण कारागिरांनी तयार केलेल्या कलाकृतींच्या प्रदर्शनास प्रारंभ







दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/जिमाका** : पीएम विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून पारंपरिकता आणि कौशल्याला नवीन ऊर्जा प्रदान करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. ही योजना म्हणजे देशात हजारो वर्षापासून असलेल्या पारंपरिक कौशल्याचा वापर विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांचा एक परिपूर्ण रोडमॅप आहे. या कौशल्यामध्ये सर्वाधिक भागिदारी अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागासवर्गीय समाजसमुहाची आहे. या समुहातील कारागिर उद्योजक व्हावेत असा आमचा प्रयत्न असून त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठे योगदान देण्यासोबतच 'सप्लाय चेन'सारख्या व्यवस्थेचा भाग व्हावे, अशी अपेक्षा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. महाराष्ट्राच्या बहुआयामी प्रगतीचा नायक शेतकरीच राहणार असून त्याच्या समृध्दीसाठी सरकार सर्व आघाड्यांवर प्रयत्नशील राहणार असल्याचीही ग्वाही प्रधानमंत्र्यांनी येथे दिली.

पीएम विश्वकर्मा योजनेचा वर्षपूर्ती सोहळा वर्धा येथील स्वावलंबी मैदानात आज पार पडला. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बोलत होते. राज्यपाल डॉ.सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री जीतन राम मांझी, केंद्रीय राज्यमंत्री जयंत चौधरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, वनमंत्री तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा आदी उपस्थित होते.

अमरावती येथील पीएम मित्रा पार्कचे ई-भूमिपूजन आणि आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजना व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजना या राज्य शासनाच्या दोन योजनांचा शुभारंभही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाला.

आजच्याच दिवशी १९३२ मध्ये महात्मा गांधी यांनी अस्पृश्यता निर्मूलनसाठी सुरू केलेल्या अभियानाची आठवण करुन देतानांच बापूजींची कर्मभूमी आणि विनोबांची साधनाभूमी असलेल्या वर्ध्यातून विकसित भारताची निर्मिती करण्याच्या आमच्या संकल्पास ऊर्जा मिळते, असे सांगून प्रधानमंत्री म्हणाले, विश्र्वकर्मा योजनेच्या वर्षपूर्तीच्या सोहळ्यासाठी आम्ही यामुळेच वर्ध्याची निवड केली. ही योजना केवळ एक सरकारी कार्यक्रम नसून विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी देशात हजारो वर्षापासून असलेल्या कौशल्याचा वापर करण्याचा एक परिपूर्ण रोडमॅप आहे. इतिहासात आपल्या देशातील समृध्दीचा मोठा आधार पारंपरिक कौशल्य हाच होता. येथील वस्त्रोद्योग, शिल्पकला, धातूविज्ञान, अभियांत्रिकी अशा साऱ्याच बाबी जगात वैशिष्टपूर्ण होत्या. जगातील सर्वात मोठा वस्त्रनिर्माता भारतच होता. मात्र पारतंत्र्याच्या कालखंडात इंग्रजांनी स्वदेशी कौशल्य नष्ट केले. या पार्श्र्वभूमीवर गांधीजींनी वर्ध्यातूनच ग्रामोद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न सुरू केले. मात्र स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात बलुतेदारी समुहाची सातत्याने उपेक्षा झाली. त्यामुळेच प्रगती आणि आधुनिकतेत देशाची पिछेहाट झाल्याची खंत प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली.

कारागिरांच्या पारंपरिक कौशल्याचा सन्मान, सामर्थ्य आणि या समाजसमूहाची समृध्दी ही या योजनेमागची मूळ भूमिका असल्याचे स्पष्ट करुन श्री. मोदी म्हणाले, देशातील सातशेहून अधिक जिल्हे, अडीच लाखांहून अधिक ग्रामपंचायती तसेच हजारो स्थानिक नागरी संस्था या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्नशील आहेत. दहा लाखांहून अधिक लोक या योजनेशी जोडले गेले असून आठ लाख शिल्पकारांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिले गेले आहे. त्यात केवळ महाराष्ट्रातीलच साठ हजारांहून कारागिर समाविष्ट आहेत. त्यांच्या कामाला आधुनिक आणि डिजिटल तंत्रज्ञानाची जोड दिली जात आहे. साडेसहा लाख बलुतेदारांना आधुनिक साधने दिली गेली आहेत. या योजनेचा सर्वाधिक फायदा याच समाजसमूहांना होत आहे. त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान देण्यासोबतच 'सप्लाय चेन'सारख्या व्यवस्थेचा भाग व्हावे, अशी अपेक्षा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्रात मोठ्या औद्योगिक विकासाची क्षमता असून त्यात वस्त्रोद्योग हा अग्रणी आहे. विदर्भात कापसाचे क्षेत्र मोठे असुनही येथील शेतकऱ्यांची यापूर्वी उपेक्षा झाल्याची खंत व्यक्त करुन प्रधानमंत्री मोदी म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली २०१४ मध्ये सरकार स्थापन झाल्यानंतर नांदगाव खंडेश्र्वर येथे टेक्सटाइल पार्कची निर्मिती झाली. आता अमरावती येथे होत असलेले पीएम मित्रा पार्क हे वस्त्रोद्योगास नवी झळाळी प्राप्त करुन देण्याच्या प्रयत्नातील पुढचे पाऊल आहे. फार्म टू फायबर, फायबर टू फॅब्रिक, फॅब्रिक टू फॅशन आणि फॅशन टू फॉरेन अशा सुत्रातून आमचे प्रयत्न सुरू असून विदर्भातील उच्च दर्जाच्या सूतापासून तयार होणारे कपडे परदेशात निर्यात होऊन येथील शेतकरी समृध्द होतील. अमरावतीच्या पार्कमध्ये दहा हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित असून १ लाखाचा रोजगार उपलब्ध होईल. औद्योगिक विकासासाठी पुरक असणाऱ्या विविध पायाभूत सुविधांचा महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. विदर्भातील सिंचन विकासासाठी महत्वपूर्ण ठरणाऱ्या वैनगंगा-नळगंगा योजनेच्या अंमलबजावणीतून १० लाख एकर क्षेत्र सिंचित होणार आहे. याशिवाय कांदा, सोयाबीन उत्पादकांनाही विविध निर्णयाच्या माध्यमातून सरकार मदत करत आहे, असे प्रधानमंत्र्यांनी आवर्जून सांगितले.

सुरुवातीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चरख्याची प्रतिकृती तर केंद्रीय मंत्री जीतनराम मांझी यांनी ग्रामीण कारागिरांनी तयार केलेल्या कलाकृती भेट देऊन प्रधानमंत्र्यांचे स्वागत केले. लघु, सुक्ष्म व मध्यम विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या परंपरागत ग्रामीण कारागिरांनी तयार केलेल्या विविध आकर्षक कलाकृतींच्या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमास आमदार सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, डॉ.पंकज भोयर, दादाराव केचे, समीर कुणावार, माजी खासदार रामदास तडस, प्रभारी विभागीय आयुक्त डॉ.विपीन ईटनकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आदींची उपस्थिती होती.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

देशातील गरीब, वंचित तसेच परंपरागत व्यवसाय करणाऱ्या कारागिरांच्या आर्थिक प्रगतीसाठी पीएम विश्र्वकर्मा ही योजना अत्यंत महत्वाची आहे. या योजनेच्या माध्यमातून कारागिरांनी उत्पादित केलेल्या वस्तुंना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्याला प्राधान्य राहणार असल्याचे सांगतांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा देशाचे नेतृत्व करत आहेत, त्यांच्या खंबीर पाठबळामुळे राज्याची प्रगती गतिमानतेने होत आहे. अमरावती येथे पीएम मित्रा पार्क हा देशातील वस्त्रोद्योगाच्या विकासाला चालना देणारा ठरणार आहे. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कापसावर प्रक्रिया करून कापड निर्यातीला चालना मिळणार आहे. या पार्कमध्ये १० हजार कोटीची गुंतवणुक होणार असून सुमारे १ लाखापेक्षा जास्त रोजगार उपलब्ध होणार आहे. तसेच आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र व पुण्यश्र्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजनांमुळे राज्यातील महिला व इतर घटकांच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीला पोषक ठरणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

देशातील सात पीएम मित्रा पार्कपैकी अमरावती येथे होत असलेल्या पार्कच्या माध्यमातून कापसापासून कापडापर्यंत व कापडापासून फॅशनपर्यंतच्या सर्व प्रकारच्या एकत्र सुविधा उपलब्ध होणार आहेत. यामुळे मोठ्या गुंतवणुकीसह रोजगार उपलब्ध होईल. पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या बारा बलुतेदारांच्या विकासाचा विचार अद्यापपर्यंत कोणीही केला नाही, परंतू प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पीएम विश्र्वकर्मा सारख्या योजनेच्या माध्यमातून बाजारपेठेला अनुकूल असलेल्या वस्तुंची निर्मिती करण्यासाठी प्रशिक्षणासह आर्थिक सहाय्य कारागिरांना उपलब्ध करून दिले आहे. याचा लाभ समाजातील शेवटच्या कारागिरापर्यंत पोहोचत आहे. बलुतेदार समाजसमुहाच्या जीवनात परिवर्तन घडविण्याची मोठी संधी या योजनेमधून उपलब्ध झाले असल्याचे सांगून शेतकऱ्यांना दिलासा देणारे निर्णय घेतल्याबद्दल उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी प्रधानमंत्र्यांचे आभार मानले.

## केंद्रीय मंत्री जीतन राम मांझी

केंद्रीय लघु, सुक्ष्म व मध्यम उद्योग मंत्री जीतनराम मांझी यावेळी म्हणाले, पीएम विश्र्वकर्मा ही योजना पारंपरिक कारागीर व शिल्पकारांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडविणारी आहे. त्यांना उच्च गुणवत्ता व प्रशिक्षण देऊन त्यांनी उत्पादित केलेला माल जागतिक बाजारपेठेत पाठवण्यास प्राधान्य दिले आहे. या योजनेंतर्गत महाराष्ट्रात १ लाख ४६ हजार कारागिरांची नोंदणी झाली आहे. कारागिरांना अत्याधुनिक साधनांसाठी ५ टक्के दराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येत असून त्यांच्या उत्पादीत वस्तुंना मोठी बाजारपेठ निर्माण करण्यात आली आहे. भारतातील कारागिरांनी तयार केलेल्या विविध वस्तुंच्या उत्पादनांचे प्रदर्शन वर्धा येथे आयोजित करण्यात आले असून या प्रदर्शनाच्या माध्यमातून ग्रामिण कारागिरांना प्रोत्साहन मिळणार असल्याचे श्री.मांझी यांनी यावेळी सांगितले.

## उपमुख्यमंत्री अजित पवार

पीएम मित्रा पार्कच्या माध्यमातून विदर्भासह राज्याच्या औद्योगिक क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. या पार्कमुळे पांढऱ्या सोन्याला खऱ्या अर्थाने सोन्याचे दिवस येणार असून येथे रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अत्यंत कमी कालावधीमध्ये मोठे प्रकल्प गतिमानतेने पुर्ण केल्यामुळे पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा विक्रम केला असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी सांगितले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक उद्योजक महाराष्ट्रात गुंतवणुक करण्यास उत्सुक आहेत. गडचिरोली येथे स्टील उद्योग तसेच महापे येथे सेमी कंडक्टर या उद्योगांचा यामध्ये समावेश आहे. प्रधानमंत्र्यांच्या विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी आमचे सरकार संपुर्ण योगदान देईल, असा विश्वास यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

## कारागिरांना प्रमाणपत्र, धनादेशाचे वितरण

प्रधानमंत्र्यांनी कळ दाबून अमरावती येथील पीएम मित्र पार्क, राज्यातील १ हजार आचार्य चाणक्य कौशल विकास केंद्रांचे उद्घाटन केले तसेच पुण्यश्र्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्ट अप योजनेचा शुभारंभ केला. पीएम विश्र्वकर्मा योजनेच्या १ लाख कारागिरांना ओळखपत्र व प्रमाणपत्र तसेच १ लाख कारागिरांना डिजिटल कौशल्य प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. देशभरातील ७५ हजार कारागिरांना कर्जाचे वितरण देखील प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आभासी पद्धतीने करण्यात आले. पीएम विश्र्वकर्मा योजनेच्या वर्षपुर्तीनिमित्त भारतीय डाक विभागाने काढलेल्या विशेष डाक तिकिटाचे अनावरण प्रधानमंत्र्यांनी केले.

## जरांगे व त्यांच्या समर्थकांनी गॅझेट वाचावे उगाच अज्ञानी मागण्या करु नये- उपोषणकर्ते मंगेश ससाणे



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** : मनोज जरांगे मागणी करत असलेले गॅजेट ओबीसी उपोषणकर्ते मंगेश ससाणे यांनी समोर आणले आहे. अंतरवाली सराटीच्या वेशीवर उपोषणाला बसलेले मंगेश ससाणे यांनी पत्रकार परिषद घेवून काही गॅजेट दाखवले. त्यात त्यांनी हैदराबाद, बॉम्बे आणि सातारा गॅजेट दाखवत मराठे हे शुद्र नसून क्षत्रिय आहेत, लढवय्ये आहेत. असा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे मराठे हे सामाजिक मागासलेले नसताना जरांगे गॅजेटमधील चुकीची माहिती देत आहेत आणि त्यांचं ऐकूण सरकार हे गॅजेट लागू करण्याच्या हालचाली सुरु आहेत. त्यामुळं सरकार या गॅजेटचाही अभ्यास करावा त्यांच्याकडे हे गॅजेट नसतील तर आम्ही त्यांना पोस्टाने पाठवू पण आम्हाला अडाणी समजू नका अशी प्रतिक्रिया मंगेश ससाणे यांनी दिली आहे.

## शेअर बाजारात नवा विक्रम, इतिहासात प्रथमच सेन्सेक्सनं गाठला ८४ हजारांचा टप्पा

**मुंबई/प्रतिनिधी** : शेअर मार्केटमधून एक दिलासादायक बातमी समोर येत आहे. आजही शेअर मार्केटमध्ये तेजी कायम असून, आज नवीन विक्रम झाला आहे. शेअर बाजारात सलग दुसऱ्या दिवशी नवा सार्वकालिक उच्चांक नोंदवला आहे. इतिहासात प्रथमच बीएसई सेन्सेक्सने ८४ हजारांचा टप्पा ओलांडला आहे. आठवड्याच्या शेवटच्या दिवशीही भारतीय शेअर बाजारात तेजी पाहायला मिळाली. देशांतर्गत शेअर बाजाराने शुक्रवारी सलग दुसऱ्या दिवशी नवा सार्वकालिक उच्चांक गाठला. अल्पावधीतच बाजारात जबरदस्त तेजीची नोंद झाली आहे.

## अभिनेता सलमान खानचे वडील सलीम खान यांना धमकी; वांद्रे पोलिसांनी केले २ जणांना अटक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : सिने अभिनेता सलमान खान यांचे वडील सलीम खान, रा. ठी. गॅलेक्सी अपार्टमेंट, बी.जे. रोड, बँडस्टँड, वांद्रे पश्र्चिम, मुंबई हे आज दिनांक १८/०९/२०२४ रोजी ८.४५ वा. बँडस्टॅन्ड येथे morning walk साठी गेले होते. ते थकल्याने windemere बिल्डिंग च्या समोर प्रोमोनाड मधील कट्ट्यावर बसले असता गॅलेक्सी कडून बँड स्टॅन्ड च्या दिशेने जाणाऱ्या एक अनोळखी स्कूटी चालक व त्याचे पाठीमागे बसलेली बुरखाधारी महिला हे त्यांची स्कूटी यू टूर्न करून आले व सलीम खान यांच्या जवळ स्कूटी थांबवून, लॉरेन्स बिश्नोई को भेजू क्या असे धमकीच्या स्वरूपात बोलून यू टर्न करून तेथून निघून गेले. फिर्यादी यांनी त्या स्कूटी चा नं पहिला असता स्कूटी चा नं.७४४४ असल्याचे दिसले. संपूर्ण नंबर त्यांना दिसला नाही. फिर्यादी यांचा सविस्तर जबाब नोंद करून त्या स्कूटी चालक व बुरखाधारी महिले विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला.



## आयफोन खरेदीसाठी नागरिकांची झुंबड, रात्रीपासूनच नागरिकांच्या लांबच लांब रांगा

**मुंबई/प्रतिनिधी** :ॲपलनं ९ सप्टेंबर रोजी आयफोन १६ मालिका लाँच केलीय. आज ॲपलनं भारतात नवीन आयफोनची विक्री सुरू केली आहे. देशातील विविध ॲपलच्या आऊटलेट्सवर फोन खरेदीसाठी नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचं दिसून येत आहे. मुंबईच्या BKC मधील कंपनीच्या स्टोअरबाहेर अनेक नागरिक आयफोन १६ खरेदी करण्यासाठी रांगेत उभे आहेत. मुंबईतील बीकेसी येथील ॲपल स्टोअरबाहेर मोठी गर्दी दिसून येत आहे. नवीन आयफोन १६ खरेदी करण्यास नागरिक उत्सुक दिसत आहे. iPhone 16 Pro, iPhone 16 Pro MaX दोन्ही मॉडेल्समध्ये आतापर्यंतचे सर्वात मोठे डिस्प्ले दिलेले आहेत. ज्याचा आकार झी मध्ये ६.३ इंच तसंच झी चरद मध्ये ६.९ इंच दिलेला आहे. या फोनमध्ये १२० कू प्रोमोशन डिस्प्ले तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.

## विविध मागण्यांसाठी ठाण्यात आदिवासी बांधवांचे बेमुदत आंदोलन

दैनिक आपला विदर्भ



**ठाणे/प्रतिनिधी** : पालघर, ठाणे, नाशिक, रायगड हे जिल्हे शहरी व ग्रामीण भागामध्ये विभागले आहेत. मोठ्या प्रमाणात या जिल्ह्यात आदिवासी व आदिम कातकरी जमातीचे पिढ्यानपिढ्यांचे वास्तव्य आहे. त्यांचे अनेक मुलभूत हक्कांचे प्रश्र्न देशाच्या स्वातंत्र्याला ७७ वर्षानंतरही प्रलंबित आहेत. त्यांच्या रोजगार, पिण्याचे पाणी, गावठाण, घराखालील जागा, जातीचा दाखला, रेशनिंग, शिक्षण, आरोग्य तसेच अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक वनहक्काची मान्यता अधिनियम २००६, नियम २००८, सुधारित नियम २०१२ या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी न झाल्याने वन हक्काचे दावे प्रलंबित असून, अपिलांवर अजूनही निर्णय झालेला नाही. तसेच दि. २ फेब्रुवारी २०२४ रोजी या कायद्यातील कलम ३ (२) प्रमाणे गावठाण निर्माण करण्याबाबत शासन निर्णय झालेला आहे, परंतु याची अंमलबजावणी होत नाही. तसेच जलजीवन मिशनचे कामे अजूनही प्रलंबित असून अजूनही गाव- पाडा-वस्तीमध्ये हर घर नळ से जल पाणी मिळालेले नाही.

हे काम निकृष्ट दर्जाचे झालेले असून आराखड्याप्रमाणे या जिल्ह्यात कुठेही जलजीवनचे काम झालेले दिसत नाही. यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे संबंधितांच्या निदर्शनास आले आहे. नागरिकांना मुलभूत अधिकार मिळण्यासाठी ग्रामसेवकांची कर्तव्य निश्र्चित करणारा ग्रामविकास व नगरविकास विभागाच्या आयुक्त, सहा. आयुक्त यांचे कर्तव्य निश्र्चित करणारा शासन निर्णय पारित करावा, वनहक्क कायद्यातील कलम ३ (२) प्रमाणे तालुक्यात दि. २ फेब्रुवारी २०२४ च्या शासन निर्णयाप्रमाणे गावठाण विस्तार करण्याचा कालबद्ध कार्यक्रम आखण्यात यावा, प्रलंबित वनहक्क दाव्याची व अपिलांची पूर्तता करून निपटारा करण्यात यावा, जलजीवन मिशनच्या कामांत झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्यात यावेत, शासनाच्या धोरणाप्रमाणे हर घर नळ से जल देण्यात यावा, जिल्ह्यातील आदिवासी शासकीय आश्रमशाळेमध्ये वसतीगृहाची क्षमता वाढवून पुरेसे कर्मचारी व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, सप्तसूत्री कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी, गावातील आदिवासींचे मुलभूत प्रश्र्न्न जातीचा दाखला, वनजमीन, घराखालील जागा, गावठाण, आधारकार्ड, रेशन कार्ड, जॉब कार्ड, घरकुल हे मुलभूत प्रश्र्न आणि पाणी, शिक्षण, आरोग्य मुलभूत प्रश्र्न जलदगतीने सोडवण्यासाठी ग्रामसेवकांकडून कालबद्ध कार्यक्रम आखून घ्यावा या मागण्यांसाठी आज पासून ठाण्यात आदिवासी बांधवांनी आंदोलन सुरु केले आहे.

पालघर, नाशिक मध्ये जिल्हापरिषद कार्यालय तर रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुका पंचायत समिति कार्यालयावर देखील आंदोलन करण्यात येणार आहे. तसेच दि. २३ सप्टेंबर २०२४ पासून पालघर, ठाणे, नाशिक व रायगड जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती कार्यालयात ठिय्या मांडून बसणार आहेत. दि. २५ सप्टेंबर २०२४ पासून ठाणे येथून पालघर, ठाणे, रायगड, नाशिक या जिल्ह्यातील हजारो आदिवासी पायी मंत्रालयाकडे धडक देऊन संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षी आपला अधिकार मिळवण्याकरिता अनेक वर्षाच्या प्रतिक्षेनंतर आदिवासी अशा पद्धतीचे मुक्कामी आंदोलन करणार आहेत.

# घरकुले बांधकामास सरकारी जागांसाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची आमदार रायमुलकर यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : उच्च न्यायालयात दाखल याचिकेमुळे सरकारी ई क्लास , एफ क्लास जागा शासनाच्या घरकुल योजनेसाठी उपलब्ध होऊ शकत नसल्याने खूप गंभीर प्रश्न उपस्थित झाला असून गोरगरीब नागरिकांना योजनेपासून वंचित राहण्याची पाळी आली आहे. घरकुल योजनांसाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक निर्णय राज्य शासनाने घ्यावा ,अशी मागणी आमदार संजय रायमुलकर यांनी केली



आहे.

मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांना काल ता.१९ रोजी बुलढाणा येथे आमदार रायमुलकर यांनी लेखी पत्र देऊन ही मागणी केली आहे.राज्य शासनाने ग्रामीण व शहरी भागातील गरीब बेघर जनतेच्या हितासाठी कल्याणकारी योजना राबवून सर्वांना घरे देण्याचे धोरण अवलंबलेले आहे .त्यानुसार अनेक लाभार्थी यांना त्याचा फायदा होऊन हक्काची घरे मिळालेली सुद्धा आहेत. अनेक योजनांच्या लाभार्थींना सदर घरे बांधण्याकरिता इ क्लास ,एफ क्लास, गायरान जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकुल करून किंवा रिक्त जागेत पंडित दीनदयाल उपाध्याय अर्थसहाय्य योजनेमधून जागा उपलब्ध करून भूखंड मंजूर करून घरकुले पूर्ण करण्यात आलेली आहेत, असे पत्रात नमूद करून आमदार रायमुलकर यांनी म्हंटले आहे की, विद्यमान उच्च न्यायालयाने सुमोटो याचिका दाखल करून घेतल्याने घरकुलांसाठी सरकारी जागा उपलब्ध होणे कठीण झाले आहे.

सदर याचिकेमुळे सरकारी ई क्लास ,एफ क्लास ,गायरान जमिनी घरकुलांसाठी सध्या होऊ शकत नसल्याचे दिसते. गोरगरिबांना घरकुले शासकीय योजनातून मंजूर झालेली असली तरी जागे अभावी सदर घरे बांधण्याचे त्यांचे स्वप्न पूर्ण होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शासनस्तरावरून जागा उपलब्धतेसाठी योग्य तो धोरणात्मक निर्णय घेऊन या जटील प्रश्नावर उपाय काढावा, अशी विनंती आमदार संजय रायमुलकर यांनी या पत्रात केली आहे. याबाबत मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आमदार रायमुलकर यांना सांगितले. आमदार रायमुलकर यांनी सदर पत्राच्या प्रति उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,अजितदादा पवार यांनाही दिल्या व याबाबत तोडगा काढण्याची विनंती केली.

## विविध वृत्त...

### २५ सप्टेंबरपूर्वी पाणी मागणी सादर करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जिल्हास्तरीय आकस्मिक पिण्याचे पाणी निश्र्चिती समितीची सभा दि. ५ ते १५ ऑक्टोबर २०२४ दरम्यान आयोजित करण्याचे आदेश देण्यात आले आहे. यात दि. २५ सप्टेंबर २०२४ पूर्वी पाणी मागणी सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पावरुन पिण्याचे पाणी आरक्षणाची मागणी नोंदविण्याबाबत, सर्व नगर परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पंचायत समिती, संबंधित ग्रामपंचायतींनी कार्यकारी अभियंता, बुलडाणा पाटबंधारे विभाग, बुलडाणा यांच्याकडे दि. २५ सप्टेंबर २०२४ पुर्वी पाणी मागणी सादर करावी लागणार आहे. यामुळे जिल्हास्तरीय आकस्मिक पिण्याचे पाणी निश्र्चिती समिती सभेमध्ये सदर मागणी उपस्थित करणे शक्य होईल. सदर सभेमध्ये प्रकल्पांमधील उपलब्ध पाणी साठ्यानुसार पिण्याच्या पाण्याचे आरक्षणास मंजूरी देण्यात येईल. याची सर्व संबंधीत बिगर सिंचन आरक्षण करणाऱ्या संस्थांनी नोंद घ्यावी, असे पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी कळविले आहे.

### धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : राज्य शासनाने धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाची स्थापना केली आहे. या मंडळामार्फत ऑटो रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालकांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यात येणार असून संबंधितांनी या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मंडळामार्फत जीवनविमा व अपंगत्व विमा योजना, आरोग्य विषयक लाभ, कर्तव्यावर असताना दुखापत झाल्यास अर्थसहाय्य, पाल्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना, कामगार कौशल्य वृद्धी योजना, ६५ वर्षावरील ऑटो रिक्षा व मिटर्ड टॅक्सी परवानाधारक यांना निवृती सन्मान योजने अंतर्गत सानुग्रह अनुदान, नवीन ऑटो रिक्षा, मिटर्ड टॅक्सी खरेदी, गृह खरेदीसाठी कर्ज आदी योजना राबविण्यात येणार आहेत. अर्जदाराकडे ऑटोरिक्षा व टॅक्सी बॅज, लायसन्स व परवाना असणे आवश्यक असून अर्जाचे नोंदणी शुल्क व ओळखपत्र शुल्काची रक्कम रु ५०० रुपये व वार्षिक सभासद शुल्क रु ३०० रुपये ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे. असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी बुलडाणा यांनी कळविले आहे.

### उपक्रमशील शिक्षक नितीन शेळके आणि फकिरा राजगुरु यांचा विनोबा ॲप मधील उत्कृष्ट कामगिरीचा सन्मान



दैनिक आपला विदर्भ

■ गजानन भगत

**नायगाव** : जिल्हा परिषद बुलढाणा व ओपन लिंक फाउंडेशन यांच्यातील सामंजस्य करार अंतर्गत राबविण्यात येणारा आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रम अर्थात विनोबा(बा) प च्या माध्यमातून जिल्ह्यातील उपक्रमशील शिक्षकांना प्रत्येक महिन्यात प्रोत्साहन पर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.

ऑगस्ट महिन्यातील तालुका स्तरावरील 'पोस्ट ऑफ द मंथ' विजेते शिक्षक नितीन शेळके सर जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा परतापुर आणि फकीरा राजगुरू सर पिंपरी माळी यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सदरील पुरस्कार गटशिक्षणाधिकारी वानखेडे सर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी अधिक जोमाने काम करण्याचे शिक्षकांना आवाहन केले. यावेळी कार्यक्रमाला शिक्षण अधिकारी काळे साहेब व सर्व केंद्रप्रमुख, विषयसाधनव्यक्ती समग्र शिक्षा पुरस्कार प्राप्त शिक्षक, तथा ओपन लिंक फाउंडेशनचे अजय राठोड (जिल्हा समन्वयक) उपस्थित होते.

### वणी येथे काँग्रेसच्या वतीने खड्ड्यात झाड लावून आंदोलन; त्वरित खड्डे बुजवण्याची केली मागणी

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी** : वणी तालुक्यातील रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. जड वाहनांची सततची वाहतूक आणि ओव्हरलोड ट्रकच्या अतिवापरामुळे रस्त्यांवर अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. या कारणाने स्थानिक नागरिकांना प्रवास करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे व त्यांचा प्रवास जीवघेणा ठरत आहे. या परिस्थितीत शेतकरी, गरोदर माता, कामगार, विद्यार्थी, आणि इतर सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी भालर रोडवर खड्ड्यामध्ये बेशरमाचे झाड लावून शासन प्रशासन यांचा निषेध केला आहे. त्वरित खड्डे बुजवावी अशी मागणी या आंदोलनातून करण्यात आली आहे.

## आ. संजय गायकवाड यांच्या विरोधात आंदोलन करण्याआधीच युवक काँग्रेसच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांना पोलिसांनी घेतले ताब्यात



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या विरोधात शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी केलेल्या आक्षेपार्ह विधानाच्या विरोधात युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रीनिवासन बी.व्ही., राज्यअध्यक्ष कुणाल राऊत यांच्या नेतृत्वात युवक काँग्रेस कडून आमदार संजय गायकवाड यांच्या मातोश्री कार्यालयाच्या हाकेच्या अंतरावर असलेले जयस्तंभ चौक या ठिकाणी युवक काँग्रेसच्या वतीने आंदोलन करण्यात येणार होते. या अगोदरच आमदार संजय गायकवाड यांच्या असंख्य समर्थकांकडून जयस्तंभ चौकात येऊन घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी मोठा तणाव निर्माण झाला होता. दरम्यान याठिकाणी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. यावेळी अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक बीबी महामुनी बुलढाणा उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील यांनी युवक काँग्रेसच्या आंदोलन आंदोलनकर्त्यांना आंदोलन करण्याच्या पूर्वीच पोलिसांनी ताब्यात घेतले.

## सुपरस्टार अभिनेता आमिर खान आज अकोल्यात

### शिवारफेरी कार्यक्रमात शेतकऱ्यांशी साधणार संवाद

दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी** : जागतिक हवामान बदल व व्यावसायिक स्पर्धेच्या कालखंडात अत्याधुनिक शेती तंत्रज्ञान, पीक पद्धती, कृषिमाल प्रक्रियेसह विपणन क्षेत्रातील अद्ययावत माहिती शेतकऱ्यांपुढे मांडण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाद्वारे दि.२० सप्टेंबरपासून तीन दिवसीय खरीप शिवार फेरी आयोजित करण्यात आली आहे. या शिवारफेरीत पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक कार्य करणारे अभिनेते आमिर खान सहभागी होऊन शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. व्यावसायिक शेतीचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांनी अवगत करणे काळाची गरज झाली आहे. त्याच्या प्रत्यक्ष वापरातून शेतकऱ्यांना समृद्धी साधता येते. विद्यापीठाद्वारे आयोजित शिवार फेरीला दि.२० सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजतापासून सुरुवात झाली. यावेळी विविध मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थित होती. तंत्रज्ञानाचा मेळा शिवार फेरीमध्ये प्रगत कृषी तंत्रज्ञान विषयक माहिती मिळणार असून विद्यापीठाचे संपूर्ण संशोधन प्रक्षेत्र अवलोकनासाठी उपलब्ध राहणार आहे. दि.२१ सप्टेंबरला आमिर खान विशेष विमानाने अकोल्यातील शिवार फेरीमध्ये सहभागी होण्यासाठी येणार आहेत. विशेष विमानाने ते सकाळी ९.३० वाजता शहरात दाखल होतील. त्यानंतर दुपारी ३ वाजेपर्यंत ते कृषी तंत्रज्ञान जाणून घेत शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. नाम फाउंडेशन व विद्यापीठात करार झाला असल्याची माहितीही कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी दिली आहे. दोनशेहून अधिक प्रात्यक्षिक गहू संशोधन विभागाच्या प्रक्षेत्रावर एकाच ठिकाणी वीस एकर क्षेत्रावर खरीप पिकांच्या विविध जातींचे तथा





तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक साकारण्यात आले आहेत. विविध विद्यापीठ तथा खासगी संस्थांद्वारे संशोधित विविध पिकांच्या जाती, लागवड तंत्रज्ञान एकाच ठिकाणी बघायला उपलब्ध राहणार आहेत.

## महावितरणचा शेतकऱ्यांच्या जीवाशी खेळ

■ वारंवार मागणी करू नही दुरुस्तीकडे दुर्लक्ष

■ अनुचित प्रकार घडल्यास सहाय्यक अभियंत राहणार जबाबदार

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी** : डोणगाव येथील महावितरणचे सहाय्यक अभियंता यांच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्याचा जीव टांगणीला लागला असून अनेक शेतकरी त्रस्त झाले आहेत.डोणगाव परिसरातील कव्हाळवाडी फाटा येथील रोहित हे गेल्या अनेक महिन्यापासून नादुरुस्त आहे.सदर रोहित दुरुस्त करण्यासाठी वारंवार मागणी करण्यात आल्यानंतरही महावितरणचे सहाय्यक अभियंता यांचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. या नादुरुस्त रोहित्रा मुळे





मात्र अनुचित प्रकार घडण्याची भीती निर्माण झाली आहे. या अनुचित प्रकाराला मात्र महावितरणचे सहाय्यक अभियंता जबाबदार राहणार आहेत.

डोणगाव येथील धोंडू रामकृष्ण बाजड यांनी डोणगाव येथील विद्युत वितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, कव्हाळवाडी फाटा येथील रोहित्र गेल्या अनेक महिन्यांपासून नादुरुस्त आहे. सदर रोहित दुरुस्त करण्यासाठी विद्युत वितरण कंपनीकडे वारंवार मागणी करण्यात आली आहे. मात्र या मागणीकडे विद्युत वितरण कंपनीने दुर्लक्ष केले आहे. या नादुरुस्त रोहित्रामुळे एखाद्या वेळेस अपघात घडण्याची भीती निर्माण झाली आहे. या ठिकाणी असलेल्या रोहीत्रामुळे परिसरातील नागरिकांनाही प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. तरी विद्युत वितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन सदर कव्हाळवाडी फाटा येथील नादुरुस्त रोहित्र तात्काळ दुरुस्त करून द्यावे, अन्यथा डोणगाव येथील विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येईल.वेळप्रसंगी परिसरातील नागरिकांना सोबत घेत कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशाराही विद्युत वितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

### चिमुकलीवर अतिप्रसंगाचा प्रयत्न

**भंडारा/प्रतिनिधी** : लाखांदूर तालुक्यातून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. काही दिवसांपूर्वी चार वर्षीय बालिकेवर अतिप्रसंगाचा प्रयत्न आणि आईचा विनयभंग केल्याचा संतापजनक प्रकार घडला होता. यानंतर पीडित कुटुंबानं न्यायासाठी मोर्चा काढला असता आरोपींनी वृद्ध महिलेवर प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात वृद्ध महिला गंभीर जखमी झाली असून तिच्यावर नागपुरातील रुग्णालयात उपचार सुरु आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, लाखांदूर तालुक्यातील कोदामेंढी इथल्या नाथजोगी समाजातील चार वर्षीय बालिकेवर अतिप्रसंगाचा प्रयत्न केला तर तिच्या आईचा विनयभंग केल्याची घटना १७ जुलैला घडली होती.

## युवक कल्याण उपक्रमांतर्गत माय भारत पोर्टलवर युवांची नोंदणी करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** :

युवक कल्याण व क्रीडा विभागाने माय भारत पोर्टलवर विविध युवा उपक्रम नोंदणी करणे, सेवाकार्य स्वच्छता हा नवीन संकल्प–स्वच्छता पंधरवडा असे विविध उपक्रम दि. १८ सप्टेबर ते २ आक्टोबर २०२४ या दरम्याण आयोजित करण्याचे निर्देश केलेले आहे. त्याअनुषंगाने बुलढाणा जिल्ह्यातील शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, महाविद्यालयांची नोंदणी करण्यासाठी वयवर्ष १५ ते २९ वयोगटातील सर्व शाळा, कनिष्ठ महाविद्यालयानी माय भारत पोर्टलवर युवा तसेच उपक्रमांची नोंदणी करण्यात यावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी केले आहे.

भारत देश युवांचा देश म्हणून ओळखला जात असून राष्ट्र निर्माणाच्या शाश्र्वत विकासाच्या मुख्य प्रवाहात युवांचे मोठे योगदान आहे. सामाजिक विकासाच्या प्रभावी माध्यमांची ओळख करुन राष्ट्रीय व सामाजिक विकासाच्या प्रवाहात युवा शक्तीचा सहभाग असून तो वाढविणे आवश्यक आहे. यासाठी जिल्हयामध्ये कार्यक्रमाचे नियोजन जिल्हा प्रशासन, राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रिय कार्यालय व नेहरु युवा केंद्र संघटनेमार्फत राबविण्यात येणार आहे.

**माय भारत पोर्टलवर युवांची नोदणी**

युवांना राष्ट्र निर्माण कार्यात सहभाग वाढविणे, विकसित भारत करण्यामध्ये युवांनी योगदान देणे याबाबत पार्टलवर युवांची नोदणी करणे आवश्यक आहे. यासाठी https://mybharat.gov.in या लिंकवर जिल्ह्यातील शाळा, कॉलेज व महाविद्यालय तसेच राष्ट्रीय छात्र सेना, स्काऊट व गाईड इ. विद्यार्थी व प्रशिक्षणार्थी नोंदणी करावी. यामध्ये युवांनी केलेल्या विविध कार्याची माहीती संकलित होते त्यानी विविध वर्षामध्ये तसेच कार्यकमामध्ये घेतलेला सहभागबाबत तपशिल एकत्रित होतो. यामुळे युवानी केलेले कार्याची वैयक्तिक माहिती पोर्टलवर उपलब्ध होते. तरी अधिक नोंदणी करण्यात यावी.

**अनुभवात्मक शिक्षण**

युवा हे विविध सामाजिक उपक्रमामध्ये सहभागी होतात त्यांचा राष्ट्राच्या जडण घडणीमध्ये मोठे योगदान आहे. सामाजिक कार्य, अनुभवात्मक शिक्षण, कौशल्याच्या संधी, नवीन संकल्पना इ. यामध्ये सहभाग घेणे आवश्यक आहे. याकरिता माय भारत पोर्टलवर आरोग्य, सायबर सुरक्षा, रस्ते सुरक्षा, पोलीस स्वयंसेवक, कौशल्य विकासात्मक कार्यक्रम इ मध्ये सहभागा बाबत नोदणी करता येते. उपकमामध्ये सहभागी झालेनंतर फोटा व कार्यक्रमाची माहिती नोदविता येते. जिल्हयामध्ये युवासाठी स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, युवक संस्था यांचे सहकार्याने कार्यक्रम आयोजन करण्यात यावे. दि.१८ सप्टेबर ते २ आक्टोबर २०२४ या कालावधित युवा कल्याणकारी विविध उपक्रम राबविण्यात येईल. सदर कार्यक्रमाची माहिती माय भारत पोर्टलवर नोदविण्यात यावी. प्रत्येक जिल्यातून किमान १०० उपकम आयोजित करण्यात यावेत. तसेच सातत्याने वर्षभर कार्यक्रम होतील याचे नियोजन करावे.

**युवांचा सेवा कार्यात सहभाग**

युवांमध्ये सेवा कार्याचे आवड निर्माण करण्यासाठी विविध संधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. जिल्हयामधील विविध रुग्णालये याकरीता निवडण्यात यावीत. सदर हॉस्पिटल यांचे व्यवस्थापनां समवेत चर्चा करुन युवांचा सहभाग सेवा कार्यालय वाढेल असे उपक्रम आयोजित करण्यात यावेत. याबाबत माहिती माय भारत पोर्टलवर नोदवावी.

**स्वच्छता उपकमाचे आयोजन**

भारत सरकार व राज्य शासन यांचे वतीने स्वच्छता विषय विविध उपकम स्वच्छ भारत मिशन व स्वच्छ भारत अभियान, राबविण्यात येते. स्वच्छता पंधरवडा आयोजित करण्याचे निर्देशित केले आहे. ग्रामीण व शहरी परिक्षेत्रातील सामाजिक ठिकाणे यांची निवड करुन दि.१८ सप्टेबर ते २ आक्टोबर २०२४ या कालावधित स्वच्छता विषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात यावेत. विभाग–जिल्हा व तालुका क्रीडा संकुलांमध्ये स्वच्छता उपक्रम राबविण्यात येवून संकुल स्वच्छ राहतील असे पाहावे.

**फिट इंडिया उपक्रम**

नागरिक व युवांमध्ये निरोगी राहण्यासाठी व्यायामाची आवड निर्माण करणे यामधून शारीरिक व मानसिक आरोग्य, तंदुरुस्ती राहण्यासाठी विविध उपकमांचे आयोजन सातत्याने करण्यात यावे. सामाजिक संस्था, औद्यागिक प्रतिष्ठाने यांचे सहकार्याने उपक्रम राबविण्यात यावे.